CNR No.MHSI01000250-2018

निशाणी १६ खालील आदेश

अपेलंट यांनी सामनेवाला नं ८ चे वारस अपिलामध्ये दाखल करण्यास परवानगी मागितलेली आहे. सदर अर्जावर रिस्पॉडंट नं. १४ ते १६ यांनी अर्जावर म्हणणे दाखल केलेले आहे. सामनेवाला नं. ८ च्या वारसांना नोटीस पाठवूनही गैरहजर. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, सामनेवाला नं. ८ हे दि. ८/०५/२०१९ रोजी मरण पावले आहेत. त्यांना सरळ व कायदेशीर चार वारस आहेत. त्यांना अपिलामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. सामनेवाला नं. ८ हे गावामध्ये राहत नसल्याने त्याची माहिती अपेलंट यांना उपलब्ध होऊ शकली नाही. त्यानंतर माहिती मिळाल्यानंतर त्यांच्या वारसांची माहिती घेणे व कागदपत्रे मिळवण्यासाठी वेळ झाल्यामुळे अर्ज हा ९० दिवसांत हजर करू शकले नाहीत. त्यामुळे विलंबनाचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच अबेटमेंट रद्द करून मागण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. सबब सामनेवाला नं. ८ चे कायदेशीर वारस हे अपिलाकामी आवश्यक असल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाला नं. १४ ते १६ यांनी म्हणणे दिले आहे की, मुळ दाव्यामध्ये मुदतीत वारस दाखल केलेले आहेत. त्यामुळे वारसांची माहिती नव्हती हे कारण खोटे आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील सामनेवाला याचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी सामनेवाला नं. ८ यांच्या वारसांना अर्जाची नोटीस पाठवली असता बजावणी झालेली आहे. बजावणी होऊनही कोणीही हजर झालेले नाही. सामनेवाला नं. ८ चे वारस हे अपिलाकामासाठी आवश्यक असे पक्षकार आहेत. अशा परिस्थितीमध्ये मुळ अर्जाचा गुणदोषावर निकाल देण्यासाठी व सामनेवाला नं. ८ च्या वारसांना संधी देण्यासाठी अर्ज मंजूर करणे योग्य होणारे आहे. अर्जास योग्य कारण दिले असल्याने मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

आदेश

१. अपेलंट यांचा निशाणी १६ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. अपेलंट यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलामध्ये दुरूस्ती व दुरूस्ती प्रत आदेश झाल्यापासून १४ दिवसांच्या आत करणेची आहे. तसे न केल्यास अर्ज आपोआप रद्द समजण्यात येईल.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2025.11.13 17:04:10 +0530

(श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १२/११/२०२५